पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. ३०

किंमत १ रुपया २५ पैसे

# शेतकरी संघटक

वर्ष १० वे

अंक २० वा

६ फेब्रुवारी १९९४

# मध्यममार्गी पंतप्रधान

**— शरद जोशी**

**दोन अधिक दोन**

दिल्लीत सगळ्यांचा तोंडी असलेला एक किस्सा चालू :

पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांना त्यांच्या नातीने (कां पणतीने) विचारले, ''आजोबा, दोन अधिक दोन किती?'' राव साहेबांनी उत्तर दिले, ''बाळ, हा प्रश्न मोठा महत्त्वाचा आणि गुंतागुंतीचा आहे. घाईघाईने त्याचे उत्तर देणे चुकीचे होईल. या प्रश्नाचा सर्वांगाने आणि साकल्याने विचार करावा लागेल. निर्णय घेताना विरोधी प्रक्षांनासुद्धा आपल्या बरोबर घेऊन चालले पाहिजे. त्यासाठी त्यांच्याशीही सल्लामसलत करून याचे उत्तर द्यावे लागेल. उत्तर शेवटी सर्वमान्य असले पाहिजे. वेगवेगळी मते लक्षांत घेऊन मधला मार्ग स्वीकारणे श्रेयस्कर होईल.''

पंतप्रधानांच्या नातीने (किंवा पणतीने) काय उत्तर दिले असेल कुणास ठाऊक! ती बिचारी निमूटपणे घरातील दुसऱ्या कोण्या कमी विद्वान माणसाकडे गृहपाठातील अडचण सोडवून घेण्यास गेली असेल. देशातील जनता तसे करू शकली असती तर किती बरे झाले असते! दुर्दैवाने जनता तसे करू शकत नाही आणि आजोबांचे उत्तर शिक्षकांना देऊ शकत नाही.

**गोलमाल भाषा की नवे धोरण?**

दावोस येथील आपल्या भाषणात नव्या अर्थव्यवस्थेविषयी बोलाताना पंतप्रधानांनी असाच गोलमाल सूर लावला आहे. समोर बसलेल्या जगातील हजारएक मोठ्या कंपन्यांच्या प्रमुखांना उद्देशून राव साहेब म्हणाले, ''नियोजनाची अर्थव्यवस्था आम्ही टाकून दिली म्हणजे काही बाजाराची व्यवस्था पूर्णतः स्वीकारली असे नाही. जो बदल घडतो आहे त्याची नोंद आम्ही हिंदुस्थानात घेतली आहे, पण आम्ही संतुलन राखणार आहोत. याला आम्ही मध्यममार्ग म्हणतो.''

प्रधानमंत्री पुढे म्हणाले, ''सरकार जनतेतील मोठ्या वर्गांना संकटाच्या खाईत फेकू शकत नाही. आर्थिक सुधारांच्या योजनांत अशा गरीब माणसांची देखील तरतूद करणे आवश्यक आहे.''

पंतप्रधानांचे हे भाषण म्हणजे त्यांच्या गोलगोल भाषणपद्धतीचा नमुना आहे की देशाच्या अर्थव्यवस्थेसंबधीच्या सरकारी धोरणातील महत्त्वाच्या बदलाची नांदी आहे? सांगणे कठीण आहे.

**काही बहाद्दर....**

नियोजन व्यवस्थेच्या बंधनातून मुक्त झालेले देश काही काळापूर्वी खुल्या व्यवस्थेकडे वाटचाल करू लागले. सिंगापूर, तैवान, दक्षिण कोरिया, हाँगकाँग या सारखी छोटी राष्ट्रे खुल्या अर्थव्यवस्थेच्या शर्यतीत आधीच पुढे होती. त्यांची प्रगती आजही झपाट्याने चालू आहे. सिंगापूरसारखे छोटे राष्ट्र भारताच्या तिप्पट निर्यात करते, केवळ आर्थिक भरभराटच नव्हे तर सामाजिक शिस्त आणि स्वच्छता यांचे आदर्श घालून देते. सिंगापूरच्या पंतप्रधानांच्या अलिकडील भेटीत खुल्या अर्थव्यवस्थेसंबधीचा त्यांचा उत्साह सिंगापूरच्या पंतप्रधानांनी हिंदुस्थानात थोडातरी पोचवला. सिंगापुरी चमत्कारानेच देशी कारखानदार चकीत झाले. झेकोस्लोव्हाकिया, पोलंड आणि काही अंशी चीन यांनीही खुली व्यवस्था आणण्यात भरघोस यश मिळवले आहे.

**काही कमनशिबी**

याच्या नेमके उलटे रशियात घडले. बाजारपेठेची व्यवस्था आणण्यात रशिया अपयशी ठरतो आहे. सबसिडी देण्यासाठी तेथील नोटांचे कारखाने धडधडत आहेत. चलानाचा महापूर वाहतो आहे. वर्षापूर्वी एक डॉलरला ५०० रूबल्स् असा विनिमयाचा दर होता. आता १ डॉलरला २००० वर रुबल मिळतात. एके काळी एका रुबलला १५ रुपये असा अधिकृत विनिमयाचा दर होता. आता रुपयास ७० रुबल असा बाजारात दर चालू आहे. रुबलची प्रचंड घसरण झाली आहे. रशियाची दमछाक होते आहे. बाहेरून मिळणारा मदतीचा हात अगदी अपुरा आहे. मोठे धाडस करून पोराने पोहायला उतरावे आणि काठापासून थोडे दूर गेल्यावर त्याचा धीर तुटावा आणि मागे फिरून काठापर्यंत परत पोचण्यासाठी त्याने धडपड चालू करावी असा काहीसा प्रकार रशियात घडतो आहे. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत

कम्युनिस्ट आणि झिरिनोव्स्कीचे माथेफिरू अनुयायी लोकसभेत ताकदीने विरोधात उभे राहिले आहेत. नवीन घटनेने अध्यक्ष येल्त्सिन यांना मोठी सत्ता दिल्यामुळे ते खुर्चीवर टिकून आहेत एवढेच. खुल्या अर्थव्यवस्थेवर विश्वास असणाऱ्या जुन्या मंत्रीमंडळातील सर्व मंत्रीगण निघून गेले आहेत किंवा त्यांना काढून टाकण्यात आले आहे. येल्त्सिन स्वतः कधीकधी खुल्या अर्थव्यवस्थेकडे जाण्याचा निर्धार जाहीर करतात, तर कधी धीम्या गतीने वाटचाल करण्याची भाषा करतात. रशियाच्या नवीन राजमुद्रेवर दोन तोंडाच्या गरुडाचे चिन्ह आहे. या गरुडाप्रमाणे रशियन अध्यक्ष दुतोंडे झालेले आहेत अशी टीकाकारांनी मल्लीनाथी केली आहे.

**चारतोंड्या सिंह**

रशियन राजमुद्रेवरील गरुडाला दोन तोंडे आहेत. तर हिंदुस्थानच्या राजमुद्रेतील सिंहास चार तोंडे आहेत. त्यामुळे पंतप्रधान आणि वित्तमंत्री तीनचार वेगवेगळी मते वेगवेगळ्या वेळी आणि स्थळी मांडत असतात. ते सुधारणांचे श्रेयही घेतात, नेहरूंचा उदो उदोही करतात, लायसेन्स परमिट इन्स्पेक्टर राज्य चालूही ठेवतात.

गेल्या महिन्यापर्यंत सुधारांचा गाडा बरा चालला होता. निदान तो मोडून पडला नव्हता एवढे तरी सर्वमान्य होते. सूर्याच्या सांकेतिक रथाचे वर्णन आहे :

''रथाला चाक एक, घोडी सात, लगाम सापांचा, रस्ता अधांतरी, सारथी बिनपायाचा.''

डॉ. मनमोहन सिंगाच्या गाड्याची परिस्थिती इतकीच बिकट राहिली आहे. देश आर्थिक संकटात सापडलेला, नेतृत्व देण्यासाठी काँग्रेसखेरीज पक्ष नाही, त्या पक्षात सिंग साहेबांना स्थान नाही. पुढारी आणि नोकरदार यांनी सरकारचाच नव्हे तर, सगळ्या देशाचा गळा आवळलेला. बेकारी, महागाई, गुंडशाही, जातीवाद यांनी सगळा समाज ग्रासलेला. राज्यकर्त्या पक्षाचे बहुमत तुटपुंजे. आणि तरीही मनमोहन सिंगानी रथ बरा हाकला. नव्याने जुगार खेळणाऱ्या माणसाला सुरवातीसुरवातीस चांगला लाभ होतो म्हणतात. जन्मभर नेहरूव्यवस्थेच्या सेवेत काढल्यानंतर खुल्या व्यवस्थेच्या दरबारात हजर झालेल्या वित्तमंत्र्यांचे नशिब सुरवातीला तरी जोरावर दिसते. महागाई वाढण्याची गती आटोक्यात आली. परकीय चलनाची गंगाजळी झपाट्याने सुधारली; सहा महिन्याच्या आयातीच्या रकमेइतकी ती बाळसेदार झाली आहे. पण खरी कसोटी पुढेच आहे.

अंदाज पत्रकातील तूट कमी करण्यात फारसे यश लाभले नव्हते. यंदाच्या वर्षी अंदाज पत्रकी तूट राष्ट्रीय उत्पादनाच्या ४% पर्यंत खाली आणता आली तर मनमोहन सिंगांनी आणखी एक फेरी जिंकली असे झाले असते. वित्तमंत्र्यांची आणि खुली अर्थव्यवस्था राबवण्याच्या कार्यक्रमाची खरी कसोटी इथेच होती. या कसोटीत ते सपशेल अपेशी झाले. तूट ८% पेक्षा जास्त राहील असे स्पष्ट दिसू लागले. तूट आटोक्यात आणून देशाची अर्थव्यवस्था सुदृढ आणि निरोगी राखायची असेल तर नेहरूजमान्याकडून वारसात मिळालेल्या नोकरशाहीच्या आणि तथाकथित 'गरीबी हटाओ' कार्यक्रमांच्या ओझ्याची वासलात लावणे अपरिहार्य आहे. यासाठी प्रचंड राजकीय इच्छाशक्ती हवी. ''दोन अधिक दोन किती?'' या प्रश्नाचे धड उत्तर एक शब्दात देऊ न शकणारे पंतप्रधान – त्यांच्या आवाक्याबाहेरची ही गोष्ट आहे.

**नोकरशहांची खुली व्यवस्था**

पंतप्रधानांनी 'दावोस' येथे केलेल्या भाषणाचा नेमका अर्थ काय? या भाषणात वित्तमंत्र्यांना दिलेला आदेश थोडक्यात असा आहे. कर फारसे वाढवायचे नाहीत, नोकरदारांना दुखवायचे नाही आणि गरीबांच्या नावाखाली चाललेले कार्यक्रम कितीही वावदूक आणि खर्चिक असले तरी त्यांना कात्री लावायची नाही. एवढी पथ्ये सांभाळा आणि मग तुम्हाला जे काही आर्थिक सुधार घडवून आणायचे असतील आणि खुली व्यवस्था आणायची असेल ती खुशाल आणा. ते आर्थिक सुधार, तो आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि तुम्ही तुमचे पाहून घ्या अशी पंतप्रधानांची वित्तमंत्र्यांना समज असावी. वित्तमंत्र्यांचे काम काय, सोपे आहे! त्यांना काय, फक्त अर्थव्यवस्था सुधारायची आहे. पण पंतप्रधानांचे काम त्याहून बिकट आहे. त्यांना आणि त्यांच्या पक्षाला पुढील निवडणूक जिंकायची आहे.

देशात ९१ साली सुरू झालेल्या आर्थिक सुधारांची दमछाक झालेली आहे. आर्थिक सुधारांचा कार्यक्रम शेतीक्षेत्राला फारसा लागू झालाच नाही. शेती निर्यात, प्रक्रियाउद्योग, व्यापार यांच्यावरची बंधने नेहरूजमान्या-प्रमाणेच चालू राहिली. थोडीफार हिंमत करून दुधावरली प्रक्रिया, उसाच्या मळीवरील नियंत्रणे ढिली करण्याचा प्रयत्न झाला. पण स्वार्थ गुंतलेल्या हितैषींनी ते प्रयत्न हाणून पाडले. यंदा २० लाख गाठी कापसाची निर्यात बिनधास्त करता आली असती. शासनाने फक्त ५ लाख गाठींचा कोटा मोकळा केला आणि काहीही कारण नसताना अचानक निर्यात बंदी केली. मोकळ्या केलेल्या कोट्यापैकी सुद्धा दीड लाख गाठींचा परवाना रद्द केला. एवढेच नव्हे तर, ५ लाख गाठी आयात करण्याची परवानगी जवळजवळ देऊन टाकलीच आहे. काँग्रेसी खुल्या व्यवस्थेच्या आर्थिक सुधारांच्या कार्यक्रमांचा मृत्युलेख गव्हाच्या आयातीपासून कापसाच्या निर्यातीपर्यंत पूर्णपणे लिहून झालाच आहे.

**मरता क्या नही करता?**

एवढ्याने भागले नाही. तूट कमी करायची आहे, कर वाढवाचे नाहीत आणि सरकारी नोकरदारांची खुशमिजाशी कमी करायची नाही अशा धर्मसंकटात सापडलेल्या वित्तमंत्र्यांनी जे काही करणे शक्य होते ते केले आणि अंदाज पत्रक सादर करण्याच्या महिनाभर आधी प्रशासकीय किंमती झपाट्याने वाढवण्याचा तडाखा सुरू केला. घरगुती गॅसच्या किंमती वाढवल्या, त्यानंतर

स्वस्त धान्याच्या दुकानातील साखर, गहू आणि तांदूळ यांच्या किंमती वाढवल्या, आणि शेवटी दरसालप्रमाणे पेट्रोल आणि डिझेलच्याही किंमती वाढवल्या. चालू आर्थिक वर्षाचे दोन महिने अजून शिल्लक आहेत. जाहीर केलेल्या भाववाढीमुळे उरलेल्या ५५०० ते ६००० कोटी रुपयांनी उत्पन्न वाढेल आणि अंदाजपत्रकातील तुटीची टक्केवारी ठाकठीक असल्याची बतावणी करता येईल अशा हिशेबाने वित्तमंत्र्यांनी ही धडपड केली आहे. पण या खटाटोपात त्यांचे 'गाढवही गेले आणि ब्रह्मचर्यही गेले' अशी अवस्था होणार आहे.

**आत्मघाताचा मार्ग**

पेट्रोलियमची किंमत वाढवणे हा सरकारी उत्पन्न वाढवण्याचा सोपा उपाय. म्हणून गेली कित्येक वर्षे प्रत्येक वित्तमंत्री सोन्याची अंडी घालणारी ही कोंबडी वापरू पाहातात. डिझेल सबसिडीच्या भावाने विकले जात असे. ती सबसिडी संपवणे खुल्या व्यवस्थेच्या सिद्धांताप्रमाणे योग्य असेलही. पण हिंदुस्थानातील पेट्रोलची किंमत अमेरिकेच्या तुलनेने आजही तिप्पट आहे. तेव्हा पेट्रोलच्या किंमती वाढवणे बिलकुल असमर्थनीय आहे. जगभरच्या पेट्रोलियम पदार्थांच्या किंमती झपाट्याने घसरत आहे. अशा परिस्थितीत येथील पेट्रोल महाग करणे निव्वळ आत्मघाताचे लक्षण आहे. गेल्या निदान तीन पेट्रोलच्या किंमतवाढींचा अनुभव असा : पेट्रोलची किंमतवाढ नोटा सरळसरळ छापण्यापेक्षाही अधिक महागाई भडकवणारी आहे. पेट्रोलच्या किंमती वाढताच ऑटोरिक्षापासून ते टॅक्सी, ट्रक, बसपर्यंत एकूण सगळीच वाहतूक महाग होते आणि सगळ्याच वस्तूंच्या किंमती पेट्रोलच्या किंमतवाढीपेक्षा कितीतरी अधिक पटीने वाढतात. त्याखेरीज आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आधीच नाजूक असलेली भारतीय अवस्था अधिकच कठीण होऊन जाईल. तरीही वित्तमंत्र्यांनी पेट्रोलियम पदार्थांच्या किंमती वाढवल्या आहेत. गेल्या दोन वर्षांत चलनवाढीची गती आटोक्यात आणण्याची जी कामगिरी त्यांनी करून दाखवली होती त्यावर या कारवाईने सपशेल पाणी पडणार आहे.

**सरकारला पैसे द्या आणि देश बुडवा**

शेअर घोटाळा प्रकरणी राजीनामा देण्याची वेळ आली तेव्हा वित्तमंत्र्यांनी म्हटले होते, ''माझ्या राजीनाम्याने आर्थिक सुधारांच्या कार्यक्रमावर काहीही विपरीत परिणाम घडणार नाही, कारण कार्यक्रमाचे खरे सूत्रधार पंतप्रधान स्वतः आहेत.''

वित्तमंत्र्यांच्या या विधानाची सचोटी आता स्पष्ट होत आहे. आर्थिक सुधारणा महत्त्वाची खरी पण नोकरदारांची ऐष चालू ठेवणे हे त्याहूनही महत्त्वाचे. ही पंतप्रधानांची आर्थिक नीती आहे. १५,४०० कोटी रुपये एकूण सरकारी खर्चापैकी ७८,००० कोटी रुपये प्रशासकीय खर्चात जातात २१,००० कोटी रुपये सबसिडीत जातात आणि कर्जावरील व्याजापोटी ३४,००० कोटी रु. जातात. असली अंदाधुंद परिस्थिती आटोक्यात आणायची असेल तर सबसिडी आणि नोकरदारांवरील खर्च निदान निम्म्याने कमी करण्याची गरज आहे. ती पुरी करण्याची राजकीय इच्छाशक्ती आणि सामर्थ्य असणारे सरकार दिल्लीत आले पाहिजे. अन्यथा, घसरणीला लागलेला देश विनाशापर्यंत पोचेल हे निश्चित. सारे विरोधी पक्ष या भाववाढीविरुद्ध ओरड करीत आहेत, आंदोलन करण्याची भाषा करीत आहेत. सत्य परिस्थिती अशी आहे की, सध्याच्या राजकीय पक्षांपैकी कोणताही सत्तेवर आला तरी त्याला दुसरा काही पर्याय असणार नाही. कारण सरकारी खर्च कमी करण्याची कोणत्याही पक्षाची इच्छा नाही.

**दारूडे सरकार**

सरकारची स्थिती दारूड्या नवऱ्यासारखी झाली आहे. बायकोचे दागिने, अगदी मंगळसूत्रसुद्धा काढून घेऊन आपले व्यसन पुरे करणे त्याला महत्त्वाचे वाटते. सरकारी अंदाधुंद खर्च चालविण्यासाठी गॅस, अन्नधान्य आणि पेट्रोलियम पदार्थ यांच्यावरील भाववाढ करण्यात आली आहे. येत्या काही दिवसात रेल्वे, टेलिफोन, टपाल यांच्यात भाववाढ होईल हे जवळजवळ नक्कीच आहे. लोकांनी निमूटपणे ही भाववाढ मान्य केली तर काय होईल? नोकरशाही आणखी फोफावेल. उद्योजक आणि निर्यातदार यांच्या मार्गात अधिक अडचणी निर्माण होतील. परिणामी, देश अधिक संकटात सापडेल आणि समाजवादी रशियाच्या घसरगुंडीवर नेहरूवादी भारतही घरंगळत जाईल.

नोकरदारांवरील आणि सरकारी उधळपट्टीवरील खर्च तडाख्यात कमी करण्यांत आला नाही तर सरकारला मिळणारा प्रत्येक पैसा देशाला विनाशाकडे नेणारा ठरेल. 'दारूड्या'शासनाला एक पैसाही देणे म्हणजे देशाचा घात करणे आहे. देशाला विनाशाकडे नेणे आहे. सर्व देशातील आम जनतेकडे राव सरकारची 'नशाबाजी' बंद करण्याचा निश्चय केला पाहिजे. त्यात यश येणे कठीण आहे असे दिसल्यास देश वाचवण्यासाठी खुल्या अर्थव्यवस्थेवर खरीखुरी श्रद्धा असलेला व जातीयवाद, नोकरशाही आणि भ्रष्टाचार संपवून टाकण्याचा निर्धार असलेला राजकीय पर्याय उभा करण्याचा निर्धार केला पाहिजे.

गेल्या आठवड्यातील किंमतवाढ ही देशाला आग लागल्याच्या धोक्याची भयसूचक घंटा आहे. पंतप्रधान मुत्सद्दी असोत, राजकारणी असोत किंवा 'दोन अधिक दोन' याचेही उत्तर देण्याची टाळाटाळी करणारे 'मध्यमवर्गी' असोत, देशाचे भवितव्य त्यांच्या हाती सुरक्षित नाही. त्यांचा मध्यममार्ग म्हणजे नियंत्रण आणि खुलीव्यवस्था यांच्यातील चांगल्या गुणांचा समुच्चय नाही, त्यांचा मध्यममार्ग दोन्ही व्यवस्थातील केवळ दुर्गुणांचा गठ्ठा आहे. पंतप्रधानांचा मध्यममार्ग स्त्री-पुरुषांच्या उत्तमोत्तम गुणांची मूर्ती-अर्धनारीनटेश्वर नाही. त्यांचा मध्यममार्ग ना – कर्त्यांचा, ना मर्दांचा, निष्क्रियतेचा 'अमंगल पंथ' आहे.

● ● ●

## अकोला-अमरावती-बुलढाणा

# बळीराज्य अवतरले

औरंगाबाद अधिवेशनाने दिलेल्या 'बळीराज्याच्या आदेशां'ची अंमलबजावणी त्या अधिवेशनाने वाघ-वाघीणपण दिलेल्या शेतकरी स्त्री-पुरुषांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात उत्साहाने सुरू केली आहे. 'इंडियन' वृत्तपत्रांना या उपक्रमांची दखल घ्यावीशी वाटली नसली तरी ते वाघाच्या सामर्थ्याने सुरू आहेत. आजतरी बळीराज्याच्या आदेशांच्या अंमलबजावणीत अकोला, बुलढाणा व अमरावती या जिल्ह्यांनी अग्रस्थान मिळविलेले आहे.

तीनही जिल्हे कापूस उत्पादक. औरंगाबादहून परतल्या परतल्या अकोला जिल्ह्याच्या कारंजा तालुक्याने पहिली डरकाळी फोडली आणि 'कापूस सीमापार' आंदोलनाची घोषणा केली. आंदोलनाच्या सेनापती पदाची धुरा त्यांना शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीचे सदस्य श्री. प्रकाश पोहरे यांच्या खांद्यावर दिली आणि त्यांनीही ती आनंदाने स्वीकारली. ११ नोव्हेंबर १९९३ रोजी कारंजा तालुक्यातील शेतकऱ्यांनी तहसील कचेरीवर मोर्चा नेऊन 'आता आम्ही इंडिया सरकारच्या कायदेकानूंचे बांधील नसल्याचे' घोषित केले आणि १७ नोव्हेंबर १९९३ रोजी हिवरखेड येथून शासकीय खरेदीचा एकाधिकार झुगारून कापूस मिरवणुकीने वाजत गाजत महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून मध्यप्रदेशात नेण्याचा कार्यक्रम घोषित केला आणि त्याच ठिकाणी काटापूजन करून प्रातिनिधिक स्वरूपात कायदेभंग करून श्री. प्रकाश पोहरे यांनी या आंदोलनाचे सेनापतीपद स्वीकारले.

१७ नोव्हेंबर १९९३ रोजी हिवरखेड येथून अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी 'कापूस आमचा, मालक आम्ही; भाव मिळेल तिथे विकू आम्ही' अशा घोषणा देत आपल्या शेतात घाम गाळून पिकविलेले पांढरे सोने एकाधिकाऱ्यांना लुटू न देता मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर येथे वाजत गाजत नेले व क्विंटलमागे सरासरी २०० रुपये अधिक भाव मिळविला. ४० वाहनांबरोबर असलेल्या शेतकऱ्यांची संख्या (ज्यात 'नाना पाटील ब्रिगेड'चे सैनिकही होते) पाहून पोलिसांनी जाताना अडवणूक करण्याची धडपड आवरती घेतली.

पण, औरंगाबाद अधिवेशनातून परतलेल्या शेतकऱ्यांतील 'वाघपणा'चा अंदाज न आल्याने परतणाऱ्या शेतकऱ्यांना सीमेवरील नाक्यातील पोलिसांनी अडवून 'हप्ता' वसुलीचा प्रयत्न केला. त्यामुळे सुरू झालेल्या वादविवाद मिटविण्यासाठी सेनापती प्रकाश पोहरे गेले असता त्या पोलिसांनी त्यांना धक्काबुक्की केली. पोलिस नशेत आहेत हे पाहाताच सेनापतींनी त्यांना पकडून त्यांच्या वरिष्ठांच्या हवाली केले.

पण, एकूणच पोलिस यंत्रणा कापूस 'फुकटात' सीमापार होण्याने चिडली होती. त्यामुळे नशेतल्या पोलिसांवर कारवाई करण्याऐवजी पोलिस अधिकाऱ्यांनी प्रकाश पोहरे यांना फसवून व ११० रुपयांचा दरोडा घातल्याचा आरोप ठेवून अटक केली व कुठे नेले ते लोकांना कळू दिले नाही.

शेतकऱ्यांच्यात प्रक्षोभ झाला व या 'सीमापार कापूस आंदोलना'च्या सेनापतींच्या अटकेच्या निषेधार्थ अकोला, अमरावती व बुलढाणा जिल्ह्यांत शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे बंद, रास्ता रोको, निदर्शने, मोर्चे इत्यादी मार्गांनी आंदोलन केले.

हिवरखेड-बऱ्हाणपूर आंदोलनातील यशाने अकोला, अमरावती, बुलढाणा या तीनही जिल्ह्यांतील शेतकऱ्यांतील शक्ती वाढली. अटकेच्या निषेधार्थ शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाने सेनापतींचीही हिम्मत दुणावली आणि आंदोलनाच्या पुढच्या टप्प्यात ३ डिसेंबर व ५ डिसेंबर रोजी या तीन जिल्ह्यातून १७७१ वाहनातून सुमारे ७५ हजार क्विंटल कापूस, बऱ्हाणपूर मार्केटमध्ये विकण्यात आला. पोलिसांचे अनेक अडथळे मोडून काढून

दरम्यान महाराष्ट्र शासनाने कापूस परराज्यात जाऊ देऊ नये असा फतवा नव्याने काढला. पुन्हा एकदा पोलिस यंत्रणेला चलती आली. राजरोसपणे पावत्या देऊन कापसाची चोरटी वाहतूक सुरू झाली. शेतकरी संघटनेच्या नाना पाटील ब्रिगेडने त्यासंबंधी सज्ज्ड पुरावे गोळा केले, व्हिडिओ फिल्मही काढून घेतली आहे.

१९८५/८६ च्या कापूस आंदोलनात पुढाकाराने चमकलेल्या बुलढाणा जिल्ह्याने याहीवेळी आपले स्थान कायम ठेवले.

१६ डिसेंबर रोजी आंदोलनाचा दुसरा टप्पा, चिखलीवरून बऱ्हाणपूरला कापूस रवाना करण्याचा ठरविला गेला. महाराष्ट्र शासनाचे कर्तव्यदक्ष पोलिस खाते तयार झाले. चिखली-बुलढाणा मार्गावर दोन ठिकाणी दगडाचे अडथळे उभे करून त्यांनी 'रास्ता रोको' केले होते. पण बऱ्हाणपूरला जाणाऱ्या चिखली, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा या तालुक्यांतील सुमारे दीडशे ट्रक, ट्रॅक्टर, मॅटेडोरच्या संरक्षणासाठी सज्ज असलेल्या शेतकरी सैनिकांनी पोलिसनिर्मित दगडी अडथळे दूर करून मोठ्या दिमाखात ही

### त्याला धरून पत्र्या मारा

*पाटील आहे सरकारचा प्यारा*
*त्याला धरून पत्र्या मारा!*

*चला, चला, बायानो चला,*
*वेसण ओवू पाटलाच्या नाकाला!*

*काय करील तो फौजदार?*
*सरकार आपले उष्टे खाणार!*

*खाऊ भाकर अन् कांदा,*
*करू देशाचा गं धंदा!*

*हाडे उगाळून शान मरा,*
*पन देश स्वतंत्र करा!*

**कोंडाबाई सावंत**
वाघोली ता. कोरेगाव, जि. सातारा
२६ एप्रिल १९४६

हे आहे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सैन्यातील स्त्री सैनिकांचे गीत. आज 'पाटला'च्या जागी आख्खी नोकरशाही आणि गावपुढारी बसले आहेत. देशात ४२ चीच परिस्थिती आहे फरक फक्त गोरा काळा इतकाच!

रॅली चालू लागली. पोलिसांनी कान पाडून पेन्सिली हाती घेतल्या आणि इमानेइतबारे वाहनांचे नंबर तेवढे टिपून घेतले. वाटेत अनेक शेतकरी सामील झाले. खामगाव तालुक्यातील या रॅलीमध्ये बुलढाणा, मोताळा तालुक्यांतील ४० ट्रक, १५ ट्रॅक्टर, १० मॅटेडोरही या रॅलीत सामील होण्यासाठी खामगावहून त्याच दिवशी निघाले. पण त्यातील काही वाहने, इतर वाहने सीमापार झाल्यानंतर मागे राहिल्याची संधी साधून एदलाबाद येथील पोलिसांनी अडविली व कार्यकर्त्यांना अटक केली आणि शेतकऱ्यांचा कापूस फेडरेशनच्या संकलन केंद्रावर जबरदस्तीने नेला.

२३ जानेवारी १९९४ रोजी बुलढाणा जिल्ह्याने यशाची आणखी एक पायरी पादाक्रांत केली. कापूस सीमापार आंदोलनाचा तिसरा टप्पा ठरवला – कापूस सीमापार नेण्यात महिला व मुलांचा सहभाग. 'कापूस आमचा, मालक आम्ही' या निर्धाराने बुलढाणा जिल्ह्यातील वाघिणी आपल्या बछड्यांना बरोबर घेऊन, वाघांच्या खांद्याला खांदा लावून, आपल्या श्रमाने पिकविलेले सोने घेऊन 'भाव घेण्या'साठी निघाल्या. आदल्या दिवशी जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांना पोलिसांनी अटक केली. तरीही पोलिस यंत्रणेचा अंदाज पुन्हा एकदा चुकला आणि पोलिस गणवेशातील गुंड बनले. असल्या कार्यक्रमात येऊन येऊन किती स्त्रिया येणार? पण, स्त्रियांच्या प्रचंड संख्येच्या तुलनेत महिला पोलिस नगण्य. या महिला पोलिसांनी शेतकरी वाघिणींशी वाद घालण्याचा प्रयत्न केला पण या वाघिणींनी त्यांना असा धडा शिकविला की यापुढे शेतकरी आंदोलनाच्या बंदोबस्तासाठी आपण जाणार नाही असे बुलढाण्याच्या महिला पोलिसांनी सांगितल्याचे समजते. मग पोलिसांनी पुरुष शेतकऱ्यांकडे मोर्चा वळविला व काहीतरी कुरापत काढून जोरदार लाठी हल्ला सुरू केला. या लाठीहल्ल्याला विरोध म्हणून शेतकरी महिलांनी त्यात उडी घेतली तर पुरुष पोलिसांनी त्यांच्यावरही लाठी हल्ला केला. महिलांचे केस ओढून त्यांना मारहाण करण्यात आली आणि हे सगळे होत असताना पोलिसांनी महिलांना अर्वाच्य शिवीगाळही केली. या सर्व घटनांना साक्षीदार असलेल्या पत्रकारांना मारहाण करून, त्यांचे कॅमेरे हिसकवून पोलिसांनी आपल्या गणवेशातील गुंडगिरीची पावती दिली.

## सरकारी गणवेशातील गुंडांच्या गुंडगिरीचा पुरावा.

बुलढाण्याजवळ महाराष्ट्र शासनाच्या पोलिसांनी २३ जानेवारी १९९४ रोजी शेतकरी स्त्री-पुरुषांना भेदाभेद लक्षात न घेता केलेली मारहाण.

महिलांना शिवीगाळ व मारहाण करून मर्दुमकी गाजविलेल्या लुटारू शासनाच्या या गणवेशधारी गुंडांनी 'हासील' केलेली कापसाने भरलेली वाहने सरकार दरबारी म्हणजे फेडरेशनच्या केंद्रावर 'हाजिर' केली. (यापैकी काही वाहने केंद्रावर नोंदवून पुढे बऱ्हाणपूरलाही पोहोचल्याची अधिकृत माहिती कार्यकर्त्यांना मिळाली असून त्याच्या तपासासाठी नाना पाटील ब्रिगेडचे कार्यकर्ते काम करीत आहेत.)

पुरुष पोलिसांनी महिलांवर केलेला हल्ला तसेच त्यांच्याशी केलेले असभ्य वर्तन याबद्दल समाजातील विविध घटकांनी निषेध व्यक्त केला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील नाना पाटील ब्रिगेड केवळ निषेधावर न थांबता गणवेशधारी गुंडांच्या बंदोबस्ताची योजना आखण्याच्या कामास लागली असल्याचे समजते.

कापूस सीमापार आंदोलनाचे सेनापती श्री. प्रकाश पोहरे यांच्या आवाहनावरून वरील पोलिसी गुंडगिरीच्या निषेधार्थ २४ जानेवारी १९९४ रोजी अकोला शहरात बंद पाळण्यात आला.

अकोला, अमरावती आणि विशेषतः बुलढाणा जिल्ह्याने शेतकरी खरोखरीच वाघ असल्याचे सिद्ध केले आहे. केवळ गाव नव्हे तर हे जिल्हेच्या जिल्हे बळीराज्याचे जिल्हे बनले आहेत.

●●●

## शेतकरी महिला आघाडी शिबीर पुढे ढकलले

येवला येथे ६ जानेवारी रोजी झालेल्या शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकारिणी बैठकीत ठरल्याप्रमाणे फेब्रुवारीच्या ९, १०, ११ तारखांना होणारे शिबीर आणि लक्ष्मीमुक्ती महामेळावा काही अपरिहार्य कारणामुळे पुढे ढकलण्यात आले आहेत. नवीन तारखा नंतर जाहीर करण्यात येतील.

**शेतकरी महिला आघाडी**

# बळीराज्य आंदोलन विशेषांक

२१ मार्च १९९४. 'शेतकरी संघटक' पाक्षिकाचा दहाव्या वर्षाचा शेवटचा अंक प्रकाशित होणार.

३१ ऑक्टोबर १९९४ रोजी औरंगाबाद येथून महाराष्ट्रातील शेतकरी वाघवाघिणी 'बळीराज्याचा आदेश' घेऊन निघाले आणि आपल्या बळीराज्याच्या रक्षणाच्या, उत्कर्षाच्या कामाला लागले. कुठे लक्ष्मीमुक्ती, दारूदुकानबंदी, बळीराज्य गावाचा फलक असे कार्यक्रम झाले, कुठे प्रक्रियेवरील बंदी झुगारून प्रक्रिया उद्योग सुरू झाले आणि कुठे, 'आमचा माल, मालक आम्ही' म्हणून आपले उत्पादन चांगला भाव मिळेल तेथे विकण्यास नेण्याचे, तसे करतांना होणारे सरकारी अडथळे मोडून काढण्याचे कार्यक्रम झाले. हे होत असतांना या बळीराज्याच्या कृतिकार्यक्रमांची कुठे नोंद होत आहे किंवा नाही याची या बळीराज्यातील शेतकरी वाघवाघिणींना फिकीर नाही. कार्यकर्त्यांनाही फारशी फुरसत मिळाली नसावी, निदान 'शेतकरी संघटक' कडे कळविण्याची. 'इंडियन' वृत्तपत्रे तर बळीराज्याच्या बाबतीत आंधळी, बहिरी आणि म्हणून मुकी. कुठे गोळीबार झाला, माणसे मेली तरच त्यांना जाणीव होते.

'शेतकरी संघटक'ची वृत्तसंकलन व्यवस्था म्हणजे शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते.

२१ मार्च १९९४ चा हा अंक 'बळीराज्य आंदोलन विशेषांक' म्हणून प्रकाशित करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील सर्व कार्यकर्त्यांना विनंती, त्यांनी औरंगाबाद अधिवेशनातील आपल्या भागात 'बळीराज्याच्या आदेशां'च्या अंमलबजावणीसाठी झालेल्या कार्यक्रमांची (शक्यतो फोटोसहित) माहिती ५ मार्च १९९४ पर्यंत शेतकरी संघटकच्या कार्यालयाकडे पोहोचतील या बेताने पाठवावे.

'शेतकरी संघटक'च्या दशकाच्या वाटचालीला 'बळीराज्य आंदोलन विशेषांका'इतका यथार्थ पूर्णविराम कोणता असणार? आपले सहकार्य मागील दहा वर्षांतील श्रमपरिहारास आवश्यक आहे.

संपादक,
शेतकरी संघटक
अंगारमळा, आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

बळीराज्य गाव वाकी बुद्रुक, ता. देऊळगांवराजा, जि. बुलढाणा.

## कापूस निर्यातबंदी शेतकरीविरोधी

केंद्र सरकारच्या वस्त्रोद्योग खात्याची नुकतीच दिल्लीला बैठक झाली. त्या बैठकीत कापसाच्या वाढत्या किंमती रोखून धरण्यासाठी निर्यातीला परवानगी न देण्याचा, अंमलबजावणी न केलेला निर्यात कोटा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या निर्णयाचा शेतकरी संघटनेतर्फे तीव्र निषेध करण्यात येत आहे.

कापूस निर्यातीला प्रचंड वाव असून देशांतर्गत कापसाच्या किंमती पाडण्याचे नेहरूव्यवस्थेतील धोरण आजही राव सरकार तितक्याच तीव्रतेने वापरून शेतकऱ्यांची लूटमार करत आहे. एकीकडे राव सरकार डंकेल प्रस्तावाला समर्थन करते, तर दुसरीकडे देशांतील उद्योगपतीच्या दबावाखाली निर्यातीवर बंदी घालून शेतकऱ्यांना लुबाडते आहे. शेवटी केंद्र सरकारला या देशात कोणती आर्थिक व्यवस्था राबवायची आहे, असा प्रश्न निर्माण होतो. सरकारने खुल्या मनाने डंकेल प्रस्तावाला पाठींबा दिला किंवा नाही ह्याची जबरदस्त शंका येते.

केंद्र सरकारने शेतकरी विरोधी धोरणे सोडावी व शेतकऱ्यांची लूट करण्याचे थांबवावे. कापूस निर्यातीला भरपूर वाव आहे त्या संधीचा लाभ उठवावा व महाराष्ट्र कापूस पणन महामंडळालासुद्धा कापूस निर्यातीचा कोटा वाढवून द्यावा. महाराष्ट्र शासनाने देखील त्यासाठी केंद्र सरकारवर आपले वजन घालून निर्यात कोटा वाढवून घ्यावा व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यावा.

**मो. वि. टेमुर्डे**
उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधान सभा, मुंबई

बळीराज्य
जोशीसावंगी,
ता. लोहा,
जि. नांदेड

## शेतकरी संघटक पाक्षिकाच्या मालकीसंबंधी

### फॉर्म नं. ४ रुल नं ८ अन्वये निवेदन

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | अंगारमळा, मु. पो. आंबेठाण ता. खेड, जि. पुणे. |
| २. | प्रकाशन काळ | : | पाक्षिक |
| ३. | संपादक, मुद्रक प्रकाशक | : | नाव : सुरेशचंद्र पांडुरंग म्हात्रे<br>राष्ट्रीयत्व : भारतीय<br>पत्ता : अंगारमळा, मु. पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे. |
| ४. | वृत्तपत्राची मालकी व भांडवलात १% पेक्षा अधिक भागी असणारांची नावे व पत्ते | : | श्री. मोहन बिहारीलाल परदेशी मु. पो. चाकण ता. खेड, जि. पुणे. |
| ५. | रजि. क्रमांक | : | RN 39926/83 |

मी जाहिर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहे.

आंबेठाण,
६ फेब्रुवारी १९९४

**सुरेशचंद्र म्हात्रे**
प्रकाशक

## प्रधानमंत्री जी आपके मन में क्या है?

प्रति,
*मा. नरसिंहराव जी,*
*पंतप्रधान, भारत सरकार,*
नई दिल्ली,

विषय : **जीवनावश्यक चिजों की किंमते और पुरवठा पर लगे नियंत्रणो को हटाने के बारे मे.**

आदरणीय महोदय,

कुछ दिन पहले, देश के अंतर्गत गेहू, चावल, चिनी, खाने का तेल, दाल आदी बारह जीवनावश्यक चिजों की बढती हुआी कीमते रोकने तथा पुरवठा नियंत्रण करने के कारण उच्चअधिकार समिति गठित की गयी। यह शासन का निर्णय केवल खेती में उत्पन्न होनेवाली चिजों तक ही सीमित है। यह निर्णय किसानों के हित में नहीं है।

भारत सरकार ने ''डंकेल प्रस्ताव'' का समर्थन किया और उसे स्वीकारा इस लिये आपका स्वागत करते है। किंतु ''डंकेल प्रस्ताव'' खेतीहर चिजों का उत्पादन, पणन और प्रक्रिया इन क्षेत्रों में कोई भी निबंध का समर्थन नहीं करता है। क्या आपका यह निर्णय इस प्रस्ताव के खिलाफ नहीं है ? क्या आप किसानों को आर्थिक स्वाधीनता देना नहीं चाहते हैं? क्या आप उसी पुरानी सडी ''नेहरूनीति के'' अंमल के पक्षधर हैं, जिसने इस देश के किसानों को चुसा है और गाव में गरीबी, लाचारी और बेकारी को जन्म दिया है ?

सरकार बोलती एक है और करती एक है। करनी कहनी मे काफी अंतर महसूस होता है। आपसे अनुरोध है, आप ''डंकेल प्रस्ताव'' का खुले दिलसे स्वीकार करे और उच्चअधिकार समिती को रद्द करे। साथ ही साथ कपास निर्यात पर पाबंदी लगाइ गयी है, उसे हटा दे।

देश के किसानों को नेतागण, गुंडागण, भ्रष्ट अधिकारी इनके प्रभाव से मुक्त करने के लिए, किसानों के उत्पादन, प्रक्रिया और विक्री पर लगी सभी पाबंदीयाँ हटाकर किसानों को मुक्त अर्थव्यवस्था का अनुभव करने दे।

आपका स्नेहांकित
**मो. वि. टेमुर्डे**
उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा,
मुंबई

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 7th February, 1994

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
February 6, 1994

**To**

**PNCW 281**

Licence
to post
without
prepayment
**No. 87**

**कौन बढाये देश की शान । भारत का आजाद किसान ॥**

गुजरात खेडूत समाजच्या वतीने झगडीया येथे सुरू असलेल्या 'गॅस रोको' आंदोलनामध्ये सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रातील वाघ शेतकरी मोठ्या संख्येने गेले होते. त्यावेळची दोन छायाचित्रे. कार्यक्रमाचा सविस्तर वृत्तांत पुढील अंकात.

## कुर्डुच्या सर्जेराव पाटीलांचे निधन

सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी संघटना ज्यांच्या सायकलींवर जन्माला आली त्यांच्यापैकी शेतकरी संघटनेचे मनस्वी कार्यकर्ते सर्जेराव पाटील (कुर्डु ता. माढा, जि. सोलापूर) यांचे ११ जानेवारी १९९४ रोजी अतिरक्तदाबाच्या झटक्याने निधन झाले.

सतत दुष्काळाच्या छायेतील सोलापूर जिल्ह्याच्या माढा तालुक्यात १९८१/८२ मध्ये सर्जेराव श्री. शरद जोशींना घेऊन गेले. सर्जेराव व त्यांचे सहकारी यांची शेतकरी संघटनेचे काम करण्याची तळमळ पाहून शरद जोशींनी त्यांच्या बरोबर सायकलवरून माढा तालुक्याचा दौरा केला होता. एवढ्या शिदोरीवर घरची आर्थिक स्थिती बिकट असूनसुद्धा सर्जेरावांनी शेवटपर्यंत शेतकरी संघटनेच्या आंदोलनात भाग घेतला. परभणी अधिवेशनापासून त्यांनी आपल्या गावातील भिंती न् भिंती शेतकरी संघटनेच्या घोषणांनी रंगवून ठेवल्या. आजही कुर्डूमधील घरांच्या भिंती सर्जेरावांचा हा वारसा जतन करून आहेत.

शेतकरी संघटकतर्फे कार्यकर्ते सर्जेराव पाटील यांना श्रद्धांजली.

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी.-०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**